सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी पं.स. बिलोली, मुखेड व देगलूर जि.नांदेड प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी सहाय्यक अनुदान वितरण आदेश
लेखाशिर्ष- २५१५००५३ योजनांतर्गत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई- २०१५/प्र.क्र.०७/पंरा -७
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
तारीखः २ जानेवारी ,२०१६.

वाचा -

१) शासन परिपत्रक क्रमांकः वि.वि.क्र.अर्थसं२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प३ दि १७.४.२०१५.
२) शासन निर्णय क्रमांकः ग्रा.वि.वि.क्र.योजना२०१५/प्र.क्र.११३/पंरा-७, दि.२९.८.२०१५
३) शासन परिपत्रक क्रमांकः वि.वि.क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३ दि.६.१०.२०१५
४) शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र.योजना-२०१५/प्र.क्र.२०७/पंरा-७, दि.२०.११.२०१५

शासन निर्णय-

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता संपूर्ण अर्थसंकल्पास मंजूरी मिळाली असुन जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या प्रशासकीय इमारतींच्या बांधकामासाठी (रू. ६३००.०० लक्ष मुळ तरतूद + रू. २७००.०० लक्ष पूरक मागणी) एकूण रू. ९०००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित झालेली असून,मजूंर तरतूदीच्या ७० टक्के मर्यादेत या लेखाशिर्षांतर्गत खर्च भागविण्याकरीता वित्त विभागाने रू. ६३००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिली आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भीय दिनांक १७.४.२०१५ च्या परिपत्रकातील परिच्छेद-४ नुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या निधी वितरणाच्या अधिकाराच्या विहित मर्यादेच्या अधीन राहून, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या प्रशासकीय इमारतींच्या बांधकामांसाठी एकूण रक्कम रू २८१८.५० लक्ष (अक्षरी रूपये अठ्ठावीस कोटी अठरा लक्ष पंन्नास हजार फक्त) इतके सहायक अनुदान माहे सप्टेंबर व नोव्हेंबर,२०१५ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आले आहे.

३. वित्त विभागाच्या संदर्भीय दिनांक १७.४.२०१५ व दि. ६.१०.२०१५ च्या परिपत्रकात नमुद केल्यानुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या निधी वितरणाच्या अधिकाराच्या विहित मर्यादेच्या

अधीन राहून, पंचायत समिती बिलोली,मुखेड व देगलूर जिल्हा नांदेड यांना नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरिता सन २०१२-१३ मध्ये देण्यात आलेल्या निधीपैकी अखर्चित राहिलेला रू २४,१६,३४३/- (अक्षरी रूपये चोवीस लाख सोळा हजार तीनशे त्रेचाळीस फक्त) इतका निधी शासनास समर्पित केल्यामुळे याबाबतची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी रू २४,१६,३४३/-(अक्षरी चोवीस लाख सोळा हजार तीनशे त्रेचाळीस फक्त) इतके सहायक अनुदान माहे जानेवारी,२०१६ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

४. या कामांकरीता होणारा खर्च मागणी क्र. एल-३ "२५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १०१-पंचायत राज, ३१-सहायक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारत बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षा खाली सन २०१५-२०१६ साठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. याप्रकरणी ज्या कामाच्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, तो त्याच कामावर तात्काळ खर्च करुन, सदर सहाय्यक अनुदानाच्या विनियोजनासंबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल, संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठवून, त्याची प्रत या विभागाकडे आठ दिवसांत पाठविण्याची जबाबदारी जिल्हा परिषद नांदेड, मुख्य वित्त व लेखाअधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. तसेच सदर अनुदानाच्या विनियोजना संबधी महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात आलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत शासनास मुदतीत पाठविण्यात न आल्यास, जिल्हा परिषद नांदेडच्या कामावर पुढील सहायक अनुदान वितरीत केले जाणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, क्र अर्थसं -२०१५/प्र.क्र.८५/ अर्थसंकल्प३- दिनांक १७.४.२०१५ व क्र.पूरक२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प३- दि.६.१०.२०१५ मधील अटी-शर्तीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१५०००९७५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2016.01.05 16:53:28 +05'30'

(दि.बा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद

२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेय) महाराष्ट्र - १ मुंबई /महाराष्ट्र - २ नागपूर.

३. महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र - १ मुंबई /महाराष्ट्र - २ नागपूर.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

५. कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प. नांदेड

६.गटविकास अधिकारी, पंचायत समिती,बिलोली,मुखेड,देगलूर जिल्हा नांदेड

७.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. नांदेड

८.जिल्हा कोषागार अधिकारी, जि. नांदेड

९. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.

१०. उपमुख्यलेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, जि.नांदेड

११.वित्त विभाग, (व्यय १५/ अर्थ.१६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

१२.नियोजन विभाग (का.क्र.१४४४) मंत्रालय, मुंबइ ४०० ०३२.

१३.कार्यासन, वित्त-१, वित्त-७ व योजना-७ ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.

१४.निवड नस्ती कार्यासन क्रमांक पं.रा.७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.